जा.क्र.आस्था-३(१)/पो.भ.-१६/नियुक्ती आदेश क्र.-९/२०१६,
पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,पुणे
दिनांक १७/११/२०१६.

संदर्भ:- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११

विषय:- पोलीस शिपाई पदावर स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

---ooo---

## नियुक्ती आदेश :-

पुणे शहर पोलीस घटकांत रिक्त असलेल्या/होणा-या पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया दिनांक २९/०३/२०१६ ते २४/०४/२०१६ या कालावधीत पार पडली. सदर पोलीस भरती दरम्यान मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत गुणानुक्रम,सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद पुरुष व महिला उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील उमेदवारांना पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर **"पोलीस शिपाई/चालक पोलीस शिपाई ( गट-क)"** या संवर्गात वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० +२००० ग्रेड पे (अधिक रुपये ५०० /- विशेष वेतन) यामध्ये मुळवेतन रुपये ६४६०+२०००ग्रेड पे + ५०० विशेष वेतन या वेतनावर पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर येथे दिनाक ०१/१२/२०१६ पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहुन अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ.क्र | चेस्ट नं. | उमेदवारांची नावे | लिंग | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | उंची | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2786 | RATHOD SATISH BHANUDAS | M | DT-A | Open | 172 | 105 |
| 2. | 3720 | SAWANT AKASH ANIL | M | OPEN | Open | 167 | 135 |
| 3. | 13617 | LAKADE ARJUN VASANT | M | OBC | OBC- PP | 176 | 130 |
| 4. | 16279 | BUDHAWANT PRAKASH | M | OPEN | OPEN- PP | 175.2 | 145 |
| 5. | 17213 | SAYYED JAKERALLI SABBERALLI | M | OPEN | Open- PP | 186 | 164 |
| 6. | 18971 | SURYAWANSHI RAHUL | M | OBC | OBC- PAP | 176 | 123 |
| 7. | 20157 | DHAS LAHU BHAGCHAND | M | OPEN | OPEN- SP | 172 | 135 |
| 8. | 21345 | SHINDE SANJAY INDRAJEET | M | OBC | OBC- Ex.men | 170.5 | 112 |
| 9. | 22995 | CHAVAN SHARVARI RAMESH | F | DT-A | DT-A- Women | 160 | 105 |
| 10. | 23547 | KAPSE RADHA LAXMAN | F | OPEN | Open- Women- | 162 | 135 |

## अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

२. महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.,शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२-१२-२०११ नुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहुन निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधीत जात पडताळणी समितीने उमेदवाराचे पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आंत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व तुमच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० यातील तरतूदीनुसार तुमच्या विरुध्द त्वरीत कारवाई करण्यांत येईल.